दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ५५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१९ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज २८ हजार ४३८ नवे कोरोना बाधित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील करोना रुग्णवाढीला मोठ्या प्रमाणात ब्रेक लावण्यात यश आले आहे. गेल्या काही दिवसांपासून ३० हजारांपर्यंत रुग्णसंख्या खाली आली आहे. आज राज्यात २८ हजार ४३८ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे तर त्याचवेळी ५२ हजार ८९८ रुग्ण करोनावर मात करून घरी परतले आहेत. दरम्यान, करोना मृत्यूंचे प्रमाण ही आजही चिंतेची बाब असून गेल्या २४ तासांत राज्यात करोनाने ६७९ रुग्ण दगावले आहेत.

राज्यातील करोनाची दुसरी लाट गेल्या काही दिवसांपासून ओसरताना दिसत आहे. खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही आज एका कार्यक्रमात बोलताना तसे विधान केले. त्याचवेळी तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी आपण सज्ञ व्हायला हवे, असेही त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर आजची करोनाची आकडेवारी हाती आली असून दैनंदिन रुग्णसंख्या आजही ३० हजारच्या खाली राहिली आहे.

# अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लवकरच जनतेच्या सेवेत : ना.आदिती तटकरे

## ४४ वैद्यकीय अध्यापकांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथे प्रतिनियुक्तीने पदस्थापना झाल्याने अत्यंत महत्त्वाचा टप्पा पूर्ण

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी एकूण ४ टप्प्यात गट अ ते गट-क मधील नियमित १८५ पदे विद्यार्थी पदे १२१, त्याचप्रमाणे गट-क काल्पनिक पदे १३९ (बाह्यस्त्रोताने) व गट-ड काल्पनिक पदे ६५ (बाह्यस्त्रोताने) अशी एकूण ५१० पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दि.२९ जानेवारी २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

याकरिता शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत कु.आदिती तटकरे यांनी हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे, याकरिता अथक परिश्रम घेतले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग येथील प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू होणार असल्याने येथील अध्यापकांची पदे तातडीने भरणे आवश्यक होते. यासाठी आवश्यक असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपलब्धतेचा प्रश्न सोडविण्यातही पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी योग्य पाठपुराव्यानिशी यश मिळविले आहे.

यानुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दि.२९ मे २०२१ च्या पत्रान्वये केलेल्या शिफारशीनुसार एकूण ४४ अध्यापकांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथे प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्याविषयीचे आदेश जारी केले आहेत. वैद्यकीय अध्यापकांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथे प्रतिनियुक्तीने पदस्थापना झाल्याने हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रायगडकरांच्या सेवेसाठी कार्यान्वित होण्याचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. आता लवकरच हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जनतेच्या सेवेसाठी सुरू होईल, असा विश्वास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पुन्हा मदतीचा आधार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा २ जून रोजी ७०वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस दरवर्षी भारतीय जनता पक्ष व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांद्वारे मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या वाढदिवसानिमित्ताने वृक्षारोपण, शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजातील वेगवेगळ्या घटकांना आवश्यक ती मदत देणे, क्रीडाविषयक कार्यक्रम, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव असे अनेक कार्यक्रम होत असतात. सध्या कोरोनाची साथ मोठ्या प्रमाणात संपूर्ण महाराष्ट्रात तसेच पनवेल महापालिका क्षेत्रात आहे.

२०२० साली कोरोना काळात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल भाजपतर्फे पनवेल तालुका व महापालिका क्षेत्रातील चार लाख व्यक्तींना आर्सेनिक अल्बम या गोळ्यांचे वाटप, तसेच सुमारे ६० हजार गरीब व गरजू कुटुंबांना अन्नधान्य, कडधान्य इत्यादी जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले होते. या सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते कोरोना देवदूत या पुरस्काराने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना गौरविण्यात आले होते.



या वर्षीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७०वा वाढदिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले होते. या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यासंदर्भात व कार्यक्रम राबविण्याविषयी पक्ष कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या वेगवेगळ्या ३० कमिट्यांची स्थापना करून त्यांच्यावर जबाबदारीही टाकण्यात आली होती. त्या दृष्टिकोनातून कार्यकर्तेही कामाला लागले होते, मात्र दुर्दैवाने मार्च महिन्याच्या अखेरपासून पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्रात व पनवेल महापालिका क्षेत्रात कोरोनाचे रुग्ण मोठ्या संख्येने वाढू लागल्यामुळे नियोजित केलेले कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.

लॉकडाऊनमुळे रोज दैनंदिन मोलमजुरी करणारे श्रमजीवी कामगार, रिक्षाचालक, छोटे व्यावसायिक यांचा रोजगार बुडाला असून, त्यांची दैनंदिन रोजीरोटी पूर्णपणे बुडालेली आहे. अनेक गरीब कुटुंब आर्थिक विवंचनेत असून, त्यांना दोन वेळचे जेवण मिळणेही मुश्कील झाले आहे.

या अनुषंगाने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल भाजपतर्फे सामाजिक बांधिलकीतून गरीब, गरजू नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याचे ठरविण्यात आले आहे. या जीवनाश्यक वस्तूंचे सुयोग्य पद्धतीने वाटप होण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू झाले असून, पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब व गरजू व्यक्तींना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली नावे भाजप पनवेल ग्रामीण मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत (९९३०६५५२२३), पनवेल शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे (९३२२८६८१४०), खारघर शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल (९३२४२६८६३३), कळंबोली शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील (८०९७६९७५७८), कामोठे येथील नगरसेवक विजय चिपळेकर (९८१९७१७१३४) यांच्याकडे द्यावीत, जेणेकरून नागरिकांना त्यांची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून योग्य नियोजन करण्यास सोयीचे होईल.

भाजपच्या पनवेल तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या अनुषंगाने कळवण्यात येते की, आपल्या शहरातील व गावातील गरजू कुटूंबांना भाजपच्या वतीने अशी मदत व्हावी यासाठी अशा कुटूंब प्रमुखांची नावे संबंधित शहरातील अथवा गावातील बूथ अध्यक्षांमार्फत, शक्ती केंद्र प्रमुखांमार्फत तालुका/मंडल अध्यक्षांपर्यंत पोहचवण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

## उरण तालुक्यातील अनेक गावांची बत्ती गुल

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण परिसरात किनारपट्टीवरील गावातील अनेक घरांची पत्रे उडाली आहे. पडझड झाली आहे. काही ठिकाणी झाडे कोसळून घरांचे नुकसान झाले आहे. विद्युत तारा, पोल कोसळले आहेत. यामुळे उरण परिसरातील अनेक गावांची बत्तीस गुल झाली असुन रविवारी रात्रीपासुनच अंधारात बुडाली आहेत.



केगाव, नागाव, पीरवाडी आणि इतर परिसरात वादळी पाऊसात रस्त्यावर उन्मळून पडलेली झाडे बाजूला सारून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात प्रशासन गुंतले आहे. हनुमान कोळीवाडा येथील चिंतामण कोळी यांच्या घरात समुद्राच्या भरतीचे पाणी शिरले होते. मात्र पाहणी करण्यासाठी एकही शासकीय अधिकारी फिरकला नसल्याचा आरोप त्यांच्याकडून केला जात आहे.

केगाव -डोंगर आळीतील रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाला आग लागली होती. अग्नीशामक दलाने आग आटोक्यात आणली. आगीचे नेमकं कारण अद्यापही समोर आले नाही. वादळीवारे आणि मुसळधार पावसामुळे उरण परिसरातील जनजीवन सोमवारी सकाळपासूनच विस्कळीत झाले होते. पीरवाडी बीच, माणकेश्वर, घारापुरी, मोरा, करंजा सागरी किनाऱ्यावर चक्रीवादळा दरम्यान लाटांनी थैमान घातले होते. उरण परिसरातील वीज रविवारी मध्यरात्री पासूनच गुल झाली आहे. परिणामी उरण परिसरातील अनेक गावे अंधारात बुडाली आहेत.

वीज पुरवठा खंडित झाला असल्याने मोबाईल टावर निकामी ठरले आहेत. परिणामी परिसरातील विविध मोबाईल कंपन्यांची नेटवर्क सेवा पुरती कोलमडली आहे. त्यामुळे नागरिकांचा संपर्क तुटला आहे. वीज पुरवठा रविवारी मध्यरात्री पासूनच खंडित झाल्याने इमारती, घरांना पाणी पुरवठा ..../२

## संक्षिप्त...

### ईडी, सीबीआयची लोणावळ्यातील रिसॉर्टवर धाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बेहिशेबी मालमत्तांप्रकरणी गेल्या काही महिन्यांपूर्वी ईडीच्या आणि सीबीआयच्या चौकशीला सामोरे जाणारे शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या शोधासाठी ईडी व सीबीआयने लोणावळ्यामध्ये धाडी टाकल्या आहेत.

ईडीची काडी कोणी व कशासाठी केली, हे जनतेला कळून चुकलेले आहे. स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधिमंडळात परखड भूमिका मांडली आहे. मी असल्या चौकशांनी घाबरून महाराष्ट्र हिताची जबाबदारी बाजूला ठेवणार नाही. मी लढणारा आहे आणि लढत राहणार. मी स्वतः ईडीच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे, नुसता फोन केलात तरी शंभर वेळा हजर होईन. पण मुलांचा काही संबंध नसताना त्यांना कशाला बोलावता असे, आमदार प्रताप सरनाईक यांनी म्हटले गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये म्हटले होते. आता ईडी आणि सीबीआय प्रताप सरनाईकांचा शोध घेत आहे. प्रताप सरनाईक बेपत्ता झाल्याचे बोलले जात आहे. ईडीने आणि सीबीआयने लोणावळा येथील एका रिसॉर्टवर धाड टाकली आहे. काहीवेळापूर्वीच दोन्ही तपास यंत्रणांचे अधिकारी या रिसॉर्टवर पोहोचले आहेत. भाजपा नेते किरिट सोमय्या यांनी प्रताप सरनाईक गायब असल्याचा आरोप केला आहे. ईडीने सरनाईकांना ताब्यात घेण्यासाठी शोध सुरु केला आहे. याआधी गेल्या वर्षी ईडीने प्रताप सरनाईकांच्या मुलाला ताब्यात घेतले होते.

## ना.आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालयातील ७५ बेडस्चे नवीन कोविड सेंटर कार्यान्वित

### कोविडच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर काही बेडस् लहान मुलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिका अभ्यासक्रमासाठी बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीत करोना रुग्णांसाठी कोविड सेंटर उभारण्यात आले आहे. हे कोविड सेंटर पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत आज (मंगळवार,ता.१८) रोजी कार्यान्वित करण्यात आले.

यावेळी आमदार महेंद्र दळवी, अलिबाग नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रमोद गवई, तहसिलदार सचिन शेजाळ यांच्यासह जिल्हा रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित ..../२

## कोकणातील उद्ध्वस्त शेतकऱ्यास तातडीने मदत करा!

### आ.प्रशांत ठाकूर यांचे राज्य सरकारला साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लागोपाठ दुसऱ्या वर्षी ऐन हंगामात आलेल्या भीषण चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टी आणि लगतच्या जिल्ह्यांतील आंबा बागायतदारांचे कंबरडे पुरते मोडले असून केवळ कागदावरचे आदेश आणि घोषणा न करता आंबा बागायतदार व वादळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रत्यक्ष पॅकेज मिळाले पाहिजे, अशी मागणी भाजपचे उत्तरचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे राज्य सरकारकडे केली आहे.



कोकणातील हंगामी उत्पन्नाचे सर्व मार्ग तौक्ते चक्रीवादळाने धुवून टाकले असून कोकणी अर्थव्यवस्थेस यापूर्वी कधीही नव्हता एवढा जबर फटका बसला आहे. कोकणाबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातही आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले असून राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्याना मदत देण्याची व्यवस्था करावी अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

गेल्या वर्षी निसर्ग चक्रीवादळाने पुरता उद्धस्त झालेला कोकणातील शेतकरी राज्य सरकारने तेव्हा जाहीर केलेल्या मदतीपासून अजूनही वंचितच असताना यंदा तौते वादळाने नवा जबर फटका दिल्याने आंबा उत्पादक, शेतकऱ्यास सावरणे अशक्य झाले आहे. उद्धस्त कोकणास पुन्हा उभे करण्यासाठी आता त्याला थेट मदत मिळाली पाहिजे. राज्य सरकारने आढावा घेण्यात वेळकाढूपणा न करता तातडीने मदतीचे वाटप करून आंबा उत्पादक शेतकऱ्यास दिलासा दिला पाहिजे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

तौक्ते वादळामुळे झालेल्या हानीमुळे किमान पाच वर्षे शेतकऱ्यास डोके वर काढता येणार नाही. पिकांबरोबरच मालमत्तांचेही मोठे नुकसान ..../२

## पनवेल परिसरातील जाहिरातीचे होर्डींग्स ठरतात जीवघेणे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात मुख्य ठिकाणी त्याचप्रमाणे एस.टी.स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, महामार्ग, खाजगी इमारती व जागा या ठिकाणी उभारण्यात आलेले उंचच उंच जाहिरातीचे फलक (होर्डींग्स) हे तौक्ते चक्रीवादळात पनवेलकरांच्या जीवावर उठले असून अनेक ठिकाणी या होल्डींगचे पत्रे, फलक तसेच पोल पडल्याने अनेक झोपड्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कुठलीही जिवीतहानी झाली नाही.

पनवेल महानगरपालिका हद्दीत पनवेल महानगरपालिकेची परवानगी घेवून, महामार्गावर संबंधित शासकीय कार्यालयांची परवानगी घेवून तर खाजगी जागांवर मुळ मालकाच्या परवानग्या घेवून हे होर्डींग्स उभारण्यात आले आहे. काही ठिकाणी २० फुटी, काही ठिकाणी ४० फुटी तर काही ठिकाणी ६० फुटी असे होर्डींग्स एकावर एक उभारले गेले आहेत. तर होर्डींग्स उभारण्यासाठी लोखंडी गर्डर, पोल, ग्लॅव्होनाईज पत्रे, तारा, स्क्रु व फॅल्क्सचा वापर करण्यात येतो. या होल्डींगचे वेळोवेळी ..../२

## नगरसेवक रविंद्र अनंत भगत यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोना आजाराच्या वाढत्या प्रादुर्भावाने रक्तपेढ्यांमध्ये असलेला रक्तसाठा कमी असल्या कारणाने आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी केलेल्या रक्तदानाच्या आव्हानाला कळंबोलीतील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देत १०२पिशवी रक्त संकलन करून दिले.

कळंबोली येथील नगरसेवक रविंद्र अनंत भगत यांच्या कार्यलयात सदर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांना स्टीम इनहेलर, सेनिटाइज़र, मास्क, याचे वाटप करण्यात आले. तसेच सोशल डिस्टनसिंग, यांची दक्षता घेउन शिबिर पार पडले. रक्तदान शिबिरास महात्मा गांधी मिशन हॉस्पिटलचे डॉ. राजेश अत्तरडे, डॉ. शमीस्था ,पोलिस प्रशासन यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमात सहभागी आमदार बाळाराम पाटील,जे एम म्हात्रे, काशिनाथ पाटील, नगरसेवक गोपाळ भगत, नगरसेवक शंकर म्हात्रे, नगरसेविका प्रज्योती म्हात्रे, गणेश कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

# निसर्गाचा नवा तडाखा

मुंबईने आणि कोकणपट्टीने 'निसर्ग' या चक्रीवादळाला तोंड दिले त्याला अजून पुरते एक वर्षही लोटलेले नाही. अजूनही तेव्हा झालेली सारी पडझड सावरली गेलेली नाही. अशावेळी, 'तौक्ते' या चक्रीवादळाने मुंबईला आणि कोकणपट्टीला नवा तडाखा दिला आहे. गेल्या वर्षी निसर्ग हे चक्रीवादळ आले तेव्हा करोनाची पहिली लाट भरात होती. आज तौक्ते वादळाला कोकण आणि महाराष्ट्र तोंड देत असताना करोनाची काहीशी मंदावणारी पण दुसरी लाट आहेच. सामान्य माणसांनी संकटांना तोंड तरी किती द्यायची, याची जणू सत्त्वपरीक्षा सध्या चालू आहे. सोमवारी मुंबईत आणि कोकणात प्रचंड वाऱ्यांसहित पाऊस तर झालाच पण झाडे पडाली. रस्तेवाहतूक खोळंबली. जागोजागी पाणी साठले. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला. या परिस्थितीत रुग्णालयांमध्ये भरती होणाऱ्या करोना किंवा इतर रुग्णांचे किती हाल होत असतील, याची कल्पनाही करता येत नाही. 'घराबाहेर पडू नका' या इशाऱ्यांनाही आता काही अर्थच राहिलेला नाही. याचे कारण, आधीच लॉकडाउनमुळे सामान्य नागरिक घरांमध्ये अडकून पडले आहेत. आता आपण अडकून पडलेले घर तरी सुरक्षित राहावे, अशी प्रार्थना करण्याची वेळ कोकणातील हजारो रहिवाशांवर आली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये चक्रीवादळांची पूर्वसूचना मिळण्याची यंत्रणा बरीच कार्यक्षम झाली आहे. याबाबत अनेकदा आंतरराष्ट्रीय सहकार्यही केले जाते. भारताची हवामानातील बदल टिपणारी उपग्रह यंत्रणाही कार्यक्षम आहे. या साऱ्यांमुळे जीवितहानी होण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. या संकटातली तीच एक समाधानाची बाब म्हणता येईल. मात्र, अशा आपदांमध्ये होणारे शेतीचे, घरांचे, वृक्षसंपदेचे आणि एकंदर मालमत्तेचे होणारे नुकसानच इतके प्रचंड असते की त्यातून बाहेर पडायला कित्येक वर्षे लागतात. गेल्या वर्षी निसर्ग वादळामुळे कोकणात वीजपुरवठ्याची यंत्रणा जागोजाग खिळखिळी झाली होती. ती सुधारण्याचे आणि बदलण्याचे काम अनेक महिने चालू होते. गेल्या वर्षी ज्यांचे घरे-गोठे पडले, ज्यांच्या सुपारी-नारळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या, ज्यांच्या जमिनी खरवडून निघाल्या; ते सारे सावरत असतानाच हा नवा घाव पडला आहे. मुंबईत आणि कोकणातही वाऱ्याचा वेग ताशी शंभर किलोमीटरच्या पुढे गेला होता. या झंझावातात नेमकी किती झाडे पडली आणि किती घरांचे नुकसान झाले, हे कळायलाही बराच वेळ लागेल. मुंबईत विमानतळ बंद करावा लागलाच; पण अतिदक्षतेचा इशारा द्यावा लागला. करोनाच्या निर्बंधांमध्ये जे काही जनजीवन कसेबसे चालू होते, त्यावरही असा घाव पडला आहे. मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात जे दृश्य अनेकदा दिसते, ते या वादळाच्या तडाख्यामुळे मे महिन्यातच दिसले. रस्ते तुंबून गेले. गेल्या काही वर्षांत मुंबई शहराच्या किनारी भागांमध्ये पाणी खोलवर आत येण्याचे प्रमाण बरेच वाढले आहे. सोमवारीही तसे ते आले. वांद्रे-वरळी हा सागरी सेतू खबरदारीचा उपाय म्हणून बंद करावा लागला. अशी वेळ येत असेल तर मुंबईच्या सागरात भराव घालून सागरी महामार्गाचा हट्ट का पुरा केला जातो आहे, असा प्रश्न कोणत्याही सुजाण नागरिकांना पडल्याशिवाय राहणार नाही. सध्या धुमाकूळ घालणारे हे 'तौक्ते' चक्रीवादळ आता गुजरातकडे सरकणार आहे, असा हवामान तज्ज्ञांचा अंदाज आहे. या वादळाने महाराष्ट्रात नुकसान तर केलेच; पण त्याने सोबत आणलेला पाऊस किती दिवस मार देत राहील, हे सांगता येत नाही. वादळ संपूर्ण ताकदीनिशी किनाऱ्याला धडक देते, तेव्हा होणारी हानी प्रचंड असते. सुदैवाने, कोकण किंवा मुंबईला प्रत्यक्ष धडक न देता वादळे पुढे सरकतात आणि गुजरातला धडक देताना काहीशी सौम्यही होतात. इतके असूनही मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सर्व किनारी जिल्ह्यांना सध्या बसणारा तडाखा हादरवून टाकणारा आहे. करोनाचे संकट पेलणाऱ्या राज्य सरकारला आता नव्या दमाने वादळग्रस्तांना मदत देण्यासाठी सज्ज व्हावे लागेल, असे दिसते. गेल्या वेळी अनेक ठिकाणी नुकसान झालेल्या घरांचे तसेच बागांचे पंचनामे वेळेत व नीट झाले नव्हते. कित्येक वादळग्रस्तांना भरपाईही मिळण्यास विलंब झाला. हे यंदा टाळायचे असेल तर मुख्यमंत्र्यांनी काही मंत्र्यांची समिती बनवून तिच्याकडे चक्रीवादळाच्या संबंधातील सारी कामे सोपविली पाहिजेत. आज मुंबईसहित महाराष्ट्रातील हजारो रुग्ण करोनाचा सामना करीत आहेत. अशावेळी, या नव्या संकटात सापडलेल्या मुंबई व कोकणाला हात देताना नेहेमीचा सरकारी गलथानपणा होता कामा नयेत. पूर्वइशारा देऊनही अनेक जहाजे, मच्छिमारांच्या होड्या अडकून पडल्या आहेत. त्यांची सुटका करावी लागेल. गेल्या वेळी केंद्र सरकारने महाराष्ट्रातील वादळाच्या नैसर्गिक संकटात काहीशी त्रयस्थ भूमिका घेतली होती. निदान यावेळी तरी तसे न करता केंद्राने महाराष्ट्राला आवश्यक ती सगळी मदत देण्यासाठी धावून आले पाहिजे.

# चरईमध्ये झाडावरून पडून शेतकऱ्याचा मृत्यू; पंचनामा व पोस्टमॉर्टेमविनाच दफनविधी

## पोलीस पाटलांच्या निवृत्तीमुळे प्रशासनाला खबर नाही

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील चरई येथील एक शेतकरी झाडावर चढला असता हातात धरलेली फांदी निसटल्याने खाली असलेल्या फांदीवर तो अडकला. मात्र, त्यादरम्यानच त्याचा मृत्यू झाला. केवळ चरई गावातील पोलीस पाटील निवृत्त झाल्यानंतर नवीन नेमणूक न झाल्याने रविवारी सकाळी झालेल्या या घटनेची खबर प्रशासनाला नसल्याने पंचनामा व पोस्टमॉर्टेमविनाच सदर व्यक्तीचा दफनविधी पार पडल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यूसंदर्भातील अनुदानाच्या योजनांचा पोलादपूर तालुक्यात प्रसार व प्रचार झाला नसल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.

शनिवारी रात्रीपासूनच पोलादपूर तालुक्यात तोत्तेफ चक्रीवादळाची सुरूवात झाली असताना रविवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास चरई येथे नझीर मजगणकर हा शेतकरी सायंकाळी चक्रीवादळ झाल्यास घरावर लगतच्या शेवग्याच्या झाडाची फांदी पडून छप्पराचे नुकसान होईल, म्हणून ती फांदी वादळाआधीच तोडून बाजूला करण्यासाठी झाडावर चढला. यावेळी त्याने काही शेवग्याच्या शेंगादेखील काढण्याचा प्रयत्न केला.


मात्र, यावेळी वाऱ्यामुळे झाड हलण्यास सुरूवात झाली आणि नझीर मजगणकर याच्या हातातील फांदी निसटल्याने तो खाली असलेल्या फांदीवर अडकला. यावेळी त्याला फांदीवरून काढून पोलादपूर शिवाजीनगर येथील डॉ.नितीन मपारा यांच्या दवाखान्यामध्ये नेले असता तेथून ग्रामीण रूग्णालयामध्ये दाखल करण्यास सांगण्यात आले. यावेळी ग्रामीण रूग्णालयामध्ये नझीर याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. यावेळी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी प्रेत घेऊन पोस्टमॉर्टेमविनाच जाण्याची इच्छा व्यक्त केली. यामुळे नझीरचे प्रेत घेऊन ग्रामस्थ व आप्तपरिवार चरई येथील घरी आला. या घटनेची खबर चरई येथील पोलीस पाटील निवृत्त झाल्यानंतर तेथे कोणतीही नवीन नियुक्ती न झाल्याने पोलादपूर पोलीस ठाण्याला देण्यात आली नव्हती. परिणामी, या अकस्मात मृत्यूची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात न होता तसेच सदर व्यक्तीचे शवविच्छेदन व पंचनामा न होताच नातेवाईकांनी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास दफनविधी आटोपून घेतला.

पोलादपूर तालुक्यातील चरई येथील पोलीस पाटील निवृत्त झाल्याने पोलादपूर पोलीस ठाण्याला घटनेची खबर देण्यात न आल्याने अकस्मात मृत्यू रजिस्टरमध्ये या घटनेची नोंद झाली नाही. परिणामी, झाडावरून पडून मृत झालेली व्यक्ती शेतकरी असूनही त्याच्या कुटूंबियांना गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ मिळण्याची शक्यता दुरावली आहे. पोलादपूर तालुक्यातील शेतकरी कुटूंबांमध्ये गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबत कोणतीही माहिती नसल्याने अशा दूर्घटनेवेळी शवविच्छेदन अहवाल आणि पोलीस ठाण्यात कळविण्याबाबत कोणतीही जागरूकता दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रतिनिधीने ही बाब पोलादपूर पोलीस ठाणे, तालुका कृषी विभाग आणि तहसिलदार दिप्ती देसाई यांच्यासह आ.गोगावले यांना निदर्शनास आणून दिली आहे.

तोत्तेफ वादळातील पहिला बळी पोलादपूर तालुक्यातील चरई येथील असूनही केवळ पोलीस पाटील निवृत्त झाल्याने त्याबाबत सरकारी यंत्रणेला माहिती नसण्याने त्याबाबत कोणतीही भरपाई संबंधित कुटूंबियांना मिळणे दुरापास्त झाले आहे.

# सुधागडात तौक्ते चक्रीवादळाचा हैदोस ; २९१ घरांचे नुकसान, ६३ विजेचे खांब कोसळले

## नुकसानीच्या पंचनाम्याना वेग, जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी प्रशासनाची कसरत




**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

तौक्ते चक्रीवादळामुळे सुधागड तालुक्यात सोमवारी (ता.१७) पहाटे तीनच्या सुमारास सोसाट्याचा वारा व पावसाला सुरुवात झाली. या चक्रीवादळामुळे २८९ घरांचे अंशतः नुकसान झाले असून २ घरांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. तर तब्बल ६३ विजेचे खांब कोसळले आहेत. कोरोनाचा सामना करीत असताना या वादळ संकटाने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले, जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी प्रशासनाची कसरत सुरू आहे. दुसऱ्या बाजूला नुकसानीच्या पंचनाम्याना वेग आलेला आहे.

तालुक्यातील माणगाव, हातोंड, भेलिव, दर्यागाव, गौळमाळ आदी विविध गावांमध्ये घरांचे पत्रे व कौले उडणे, छप्पर पडणे या स्वरूपात नुकसान झाले आहे. सुधागड तालुक्यात दुपारी २ वाजेपर्यंत २६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. वादळाच्या पार्श्वभूमीवर ४५ कुटुंबातील एकूण १८५ व्यक्तींना अन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. १५ हाय टेन्शन पोल व ४८ लो टेन्शन पोल पडले असून विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. महावितरणतर्फे दुरुस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आ-हेत. रस्ते वाहतूक सुरळीत आहे. जमेची बाजू म्हणजे कोणतीही जीवितहानी झाली नाही. शेती नुकसानीबाबत संबंधित कृषी सहाय्यक तसेच घरांच्या नुकसानीबाबत संबंधित ग्रामसेवक व तलाठी यांना नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती सुधागड-पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिले आहे.

> रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे व त्या अनुषंगाने उपयोजनाचे तंतोतंत पालन करण्यात आले आहे. व खबरदारी घेतली आहे. तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाच्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू आहेत. नागरिकांनी संयम पाळावा
>
> **दिलीप रायण्णावार,**
> **तहसीलदार, पाली-सुधागड**

# खारकोपर गावातील जलकुंभाचे कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते भुमीपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील कोपर (खारकोपर) गावातील सिडको मार्फत मंजूर करण्यात आलेल्या बहुप्रलंबित जलकुंभाचे भुमीपूजन सोमवार दि १७ मे २०२01 रोजी सकाळी ११.०० वाजता गेल्या ३२ वर्षापासून गव्हाण विभागाच्या विकासासाठी कटिबध्द असलेले विकास पुरूष म्हणून ज्यांची ख्याती आहे असे कामगार नेते महेंद्रजी घरत यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

GSR ४ लाख लिटर्स, तर ESR २ लाख लीटर क्षमता असलेलो सिडकोच्या माध्यमातून सव्वाकोटी रूपये खर्चून हा जलकुंभ बांधण्यात येत आहे. कामगार नेते महेंद्रजी घरत १९९७ साली जिल्हापरिषद सदस्य असताना पनवेल तालुक्यात जिल्हापरिषद निधी व पायलट योजनेतून, तसेच ग्रामविकास निधीतून तब्बल ५५ जलकुंभ गव्हाण कोपर-शेलघर -करंजाडे-पळस्पे - वडघर, पडघे आदि गावांमध्ये बांधण्यात आले होते. विस बाविस वर्षांनंतर सततच्या वापरानंतर व गावातील लोकसंख्येमध्ये सिडको नोडल विकासामुळे, लोकसंख्या वाढीमुळे पाणीपुरवठा कमी पडु लागला म्हणून सातत्याने सिडको व्यवस्थापनाकडे पाठपुरावा करण्याचे काम केले. गव्हाण गावातील नविन जलकुंभाचे काम अंतिम टप्प्यात आले असून आज कोपर गाव-ातील जलकुंभाचे भुमिपुजन झाले. इतर प्रकल्पबाधीत गावातील जलकुंभांच्या कामाचा पाठपुरावा सिडकोकडे चालू आहे.

भुमीपूजनावेळी सिडकोचे कार्यकारी अभियंता राम मोहोड, सहाय्यक खान, बिजेपी नेते भार्गव ठाकूर, अजय पाटील, उपसरपंच सचिन घरत, ग्रा.प. सदस्य विजय घरत, ग्रा. सदस्या सौ. सुनिता घरत, सुधिर ठाकूर, रामदास ठाकूर, गजानन ठाकूर तसेच कोपर ग्रामस्थ उपस्थीत होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरण तालुक्यातील अनेक गावांची बत्तीस गुल

करणारे विद्युत पंप बंद पडले आहेत. परिणाम तळमजल्यावर टाकीत पाणी असुनही पाणी घडविणे अशक्य झाले आहे. त्यामुळे इमारती, घरांतील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहाण्याची पाळी येऊन ठेपली आहे. त्यामुळे अनेकांना पिण्यासाठी मिनरल वॉटर, बॉटल खरेदी करण्याची पाळी आली आहे. मात्र वाढत्या मागणीमुळे मिनरल वॉटर, बॉटल ग्राहकांना मिळेनासे झाल्याने बाहेर धोधो पाऊस पडत असतानाही पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे.

## जिल्हा सामान्य रुग्णालयातील ७५ बेडस्‌चे नवीन कोविड सेंटर कार्यान्वित

होते. या कोविड सेंटरमध्ये ७५ बेड असून या सेंटरमध्ये रुग्णांसाठी पुरेशी ऑक्सीजन व्यवस्था उभारण्यात आली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या कोविडच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर या सेंटरमधील काही बेड्स लहान मुलांसाठीही राखून ठेवण्यात येणार आहेत. करोनाच्या तिसऱ्या लाटेचा प्रभाव लहान मुलांवर पडण्याची शक्यता तज्ञ वर्तवित आहेत. यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले. तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ऑक्सीजन निर्मिती होत असून रायगड जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांनाही ऑक्सीजन पुरविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

## कोकणातील उद्‌ध्वस्त शेतकऱ्यास बांधावर जाऊन तातडीने मदत करा!

झाले असून असंख्य घरेदारे, गोठे उद्धस्त झाले आहेत. कोकणी माणसासाठी राज्य सरकारकडे कसलेही धोरण नाही, उद्योगांना मदत करण्याची कोणतीही योजना नाही आणि कोकणच्या नियोजनबद्ध विकासाचे कोणतेही मॉडेल सरकारने आखलेले नाही. एकीकडे निसर्गाचा प्रकोप आणि राज्य सरकारची डोळेझाक यांमध्ये कोकणातील शेतकरी भरडला जात आहे. गेल्या वर्षीपासूनची कोरोनामुळे टाळेबंदी आणि वादळाचा तडाखा अशा दुहेरी संकटात त्याला हात देण्यासाठी सरकारने तातडीने मदत करावी अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यास कर्जावरील व्याजमाफी, वीजबिल माफी आणि कर्जफेडीस मुदतवाढ मिळाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## पनवेल परिसरातील जाहिरातीचे होल्डींग ठरतात जीवघेणे

देखभाल होणे गरजेचे आहे. परंतु अनेक वेळा सदर होर्डींग्स उभारल्यानंतर त्याच्या गंजलेल्या तारा, पत्रे, बदलले जात नाहीत. या होल्डींगला पाठीमागून रेड ऑक्साईड मारणे गरजेचे असते. परंतु या गोष्टीकडे सदर होर्डींग्स उभारणे कर्मचारी व मालक दुर्लक्ष करीत असल्याने मोठ्या वादळवार्यांत हे होर्डींग्स निखळून निघतात, वाकतात तर कधी आडवे सुद्धा होतात. यामुळे अनेक वेळा छोटे मोठे अपघात व दुर्घटना घडल्या आहेत. दोन दिवसापूर्वी झालेल्या वादळात सुद्धा अनेक होर्डींग्स अशा प्रकारे पडले होते. पनवेल शहरातील आयटीआय जवळील होर्डींग्स सुद्धा काल सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाऱ्यामुळे हलत होते. ही बाब नगरसेवक राजू सोनी यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी येवून त्याचे फोटो काढून पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त, इतर अधिकारी वर्ग, वॉर्ड ऑफिसर, फायर ब्रिगेड, पोलीस ठाणे व पत्रकार यांना पाठविले व सदर होर्डींग्स पडत असल्याची जाणीव करून दिली. यावेळी वॉर्ड ऑफिसर कडू हे त्या ठिकाणी पोहोचले व त्यांच्या सहकार्यांनी तात्काळ त्या भागात असलेल्या झोपडपट्टी मधील नागरिकांना बाहेर काढले व काही वेळातच हे होर्डींग्स त्या झोपड्यांवर आडवे झाले. वेळीच नागरिकांना बाहेर काढल्याने पुढील अनर्थ टळला. आगामी पावसाळी दिवसात अशा प्रकारच्या घटना होण्याची दाट शक्यता असल्याने पनवेल महानगरपालिकेसह संबंधित खात्याने या सर्व होर्डींग्सचे ऑडीट करावे व नित्कृष्ट दर्जाच्या होर्डींग्सवर दंडात्मक कारवाई करावी व ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना त्यांच्या मार्फत भरपाई द्यावी अशी मागणी या परिसरातील नागरिक करीत आहेत.


# ग्रामपंचायत पालीदेवद

**मु.पालीदेवद (सुकापूर), ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर निविदा

पालीदेवद ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहित एन्क्लेव्ह ते पुरारकर बंगलो पर्यंतचे गटार बांधणे | २९९९०७/- | २९९९/- | दि.१९/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ | २६/०५/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| २ | जनार्दन पाटील यांचे घराजवळील सार्वजनिक शौचालय बांधणे | २३६३७४/- | २३६४/- | दि.१९/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ | २६/०५/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ३ | कार्तिकेय पार्क ते साक्षी पार्क सोसायटी रस्ता काँक्रीटीकरण करणे | ३०००००/- | ३०००/- | दि.१९/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ | २६/०५/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ४ | परशुराम पाटील चाळ ते सावन नगरी पर्यंत गटार बांधणे | ४९००९०/- | ४९००/- | दि.१९/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ | २६/०५/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | सदरील कामाची ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या mahatenders.gov.in ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१) वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकीटात मा.सरपंच, ग्रामपंचायत पालीदेवद यांचे नावे दि.२६/०५/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.

३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दि.२६/०५/२०२१ रोजी सायंकाळी ठिक ०४.०० वाजता मा.सरपंच यांचे समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

५) कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारांस कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६) सदर कामांचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण : पालीदेवद
दिनांक : १८/०५/२०२१

**सही/-**
**(नंदकिशोर कृष्णा भगत)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**

**सही/-**
**(योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ओवे गाव, खारघर आणि कळंबोलीत नवीन लसीकरण केंद्रे सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने ओवे गाव, खारघर येथील आरोग्य उपकेंद्र, मनुस्मृती रोटरी क्लब आणि कळंबोली येथील प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय येथे नवीन लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

यातील काळभैरव मंगल कार्यालय येथील लसीकरण केंद्रावरती ज्या नागरिकांचा पहिला डोस घेऊन २८ दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे, अशा नागरिकांना को-वॅक्सीनचा दुसरा डोस देण्यात येत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील लसीकरण केंद्रावरती आजपासून (मंगळवार दि.१८ मे) पासून ०४ ते ०५ या वेळेत ४५ वर्षावरील सर्व दिव्यांग बांधवाच्या कोव्हिड लसीकरणास सुरूवात झाली आहे. आज पहिल्या दिवशी २८ दिव्यांग बांधवांचे लसीकरण करण्यात आले.

## विक्रांत पाटील यांनी तत्परतेने प्रभागातील समस्या सोडवल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काल पासून सुरू असलेल्या वादळामुळे आणि जोरदार पावसामुळे प्रभागात काही ठिकाणी झाडं पडली होती त्यामुळे विद्युत पुरवठा ही खंडित झाला होता.

प्रभागातील नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरीत पाऊले उचलत महानगरपालिका,अग्निशमन आणि महावितरणच्या अधिकार्यां शी बोलून जुना ठाणा नाका येथील नाल्याची साफाई,पडलेली झाडं कापून त्वरित उचलून घेणें तसेच विद्युत पुरवठा सुरळीत करून घेतला. माझा प्रभाग,माझी जवाबदारी या अनुषंगाने नेहमीच प्रभागातील समस्या नगरसेवक विक्रांत पाटील तत्परतेने सोडवण्यास प्राधान्य देत असतात या बद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# माथेरानच्या दस्तुरी पार्किंग वरील वाहनांची सुरक्षा बेभरोसे ; दुबार वाहनकरांची आकारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माथेरान शहरात मोटार वाहनांना बंदी असल्यामुळे सर्व प्रकारची मोटार वाहने ही दस्तुरी नाक्यावरील वनखात्याच्या अखत्यारीत असलेल्या भूखंडावर पार्क केली जात आहेत. या पार्किंग ठिकाणी वनसंरक्षक समिती आणि नगरपरिषदेच्या मार्फत दुबार वाहन करांची आकारणी केली जाते. परंतु या जागेवर पार्क करण्यात आलेल्या कोणत्याही वाहनांच्या सुरक्षेची जबाबदारी ह्या दोन्ही खात्याकडून घेतली जात नाही. त्यामुळे नाईलाजाने वाहन मालक एकप्रकारे छातीवर दगड ठेऊन आपली वाहने दस्तुरी नाक्यावर पार्क करीत आहेत.



अनेकदा या ठिकाणी वाहनांमधून किंमती ऐवज त्याचप्रमाणे वाहन चोरीच्या घटना सुध्दा घडलेल्या आहेत. तर एखाद्या वाहनांचे नुकसान करण्याच्या प्रमाणात सुध्दा दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे.या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य असताना अद्याप त्याठिकाणी अशाप्रकारची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली नाही.त्यामुळे सर्वच स्तरातून नाराजीचा सूर उमटत आहे. याबाबत वनसंरक्षक समितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांना विचारले असता ते म्हणाले की ह्या संपूर्ण पार्किंगच्या सुशोभीकरणासाठी एमएमआरडीए मार्फत युद्धपातळीवर कामे सुरू आहेत आम्ही त्यांना याबाबतीत अनेकदा विचारणा केली आहे परंतु एमएमआरडीए चे संबंधीत ठेकेदार याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे या पार्किंगची सुरक्षा पुर्णपणे बेभरोसे असून याचा त्रास विनाकारण येणाऱ्या पर्यटकांना सहन करावा लागत आहे. माथेरान मध्ये नगरपरिषदेच्या मार्फत गावात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.नगरपरिषद प्रशासन दस्तुरी नाक्यावर काहीही कारण नसताना पर्यटकांच्या वाहनांची कर आकारणी करीत आहेत त्यामुळे नगरपरिषदेची सुध्दा एक नैतिक जबाबदारी म्हणून याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. दरवर्षी लाखो रुपयांची वसुली याच वाहन करांच्या माध्यमातून होत असताना याकडे नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने,लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. असे पर्यटकांमधून बोलले जात आहे.

दस्तुरी नाक्यावर सर्व प्रकारचे इमारतीचे साहित्य उतरविले जाते या सामानाची वाहतूक मालवाहू घोड्यांवर केली जाते परंतु आजूबाजूला पार्क केलेल्या किंमती गाड्याना अनेकदा या घोड्यावरील सामानाची धडक लागते त्यामुळे गाड्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. याबाबतीत पर्यटक तक्रार करण्यासाठी पुढे येत नाहीत.याकामी निदान सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले तर ज्या गाड्यांचे नुकसान होत आहे त्याबाबत माहिती मिळू शकते.यासाठी वनसंरक्षक समिती आणि नगरपरिषदेने पुढाकार घेणे गरजेचे आहे असेही बोलले जात आहे.

## नुकसानग्रस्त रहिवाशांनी प्रशासनाला सहकार्य करावे : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा उरण तालुक्याला बसला असून ८० पेक्षा जास्त घरांचे नुकसान झाले असून आंबा पिकांचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच महावितरण विभागाचे ४० पोल पडले आहेत. त्यामूळे तालुक्यातील काही भागांचा विद्युत पुरवठा खंडित झाला असला तरी खंडीत झालेला विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण विभागाचे अधिकारी, कर्मचारी कामाला लागले आहेत. तसेच नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी प्रशासनाचे अधिकारी ठिक ठिकाणी जात आहेत. अशा अधिकारी वर्गाला सहकार्य करण्यासाठी झालेल्या नुकसानी संदर्भात पंचनामे करण्यासाठी रहिवाशांनी सहकार्य करावे असे आवाहन उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी उरणच्या जनतेला केले आहे.



उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांना तौकते चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर विचारणा केली असता त्यांनी माहिती देताना सांगितले की, अरबी समुद्रात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे निर्माण झालेल्या तौक्ते चक्रीवादळाचा उरण तालुक्याला ही भयानक तडाखा बसला आहे. दोन महिला दगावल्या आहेत.८० पेक्षा जास्त घरांची कौले, पत्री उडून नुकसान झाले आहे. आंबा पिकांचे,विट भट्टी व्यावसायिकांचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विद्युत पुरवठा करणारे पोल पडून विद्युत तारा तुटल्या आहेत. त्यामुळे काही भागांचा विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तसेच करंजा, मोरा बंदरात नांगरून ठेवलेल्या होड्यांचे ही नुकसान झाले आहे.


यासर्व नुकसानीची पाहणी करण्यासाठी प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी जात आहेत. तरी नुकसानग्रस्त रहिवाशांनी, शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या अधिका-यांना सहकार्य करावे आणि झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी पुढाकार घ्यावा.असे आवाहन उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी उरणच्या जनतेला केले आहे. तसेच महावितरण कार्यालयातील अधिकारी कर्मचारी खंडीत झालेला विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी कामाला लागले आहेत.

## तौक्ते चक्रीवादळाचा जेएनपीटीसह खासगी चारही बंदरांना फटका

**दै.रायगड नगरी । उरण**

तौक्ते चक्रीवादळाचा फटका येथील जेएनपीटी बंदरासह चारही खासगी बंदरांनाही बसला आहे. खबरदारीची उपाययोजना योजना म्हणून रविवारी सकाळपासूनच सर्वच बंदराचे काम बंद करण्यात आले होते. यामध्ये रेल्वेची कंटेनर वाहतूकही बंद करण्यात आली होती.

जेएनपीटीने घेतलेल्या खबरदारीच्या उपाययोजनांमुळे चक्रीवादळामुळे एका झाडाच्या कोसळण्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. सोमवारी १७ मे रात्री ११ वाजल्यापासून जेएनपीटीसह अन्य चारही बंदरातील ऑपरेशन व इतर कामांना सुरूवात केली आहे.तसेच बंदराबाहेर होल्ड करण्यात आ-लेली मालवाहू जहाजे बंदरात येतील अशी माहिती जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली आहे.



# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आ.महेंद्र दळवी यांच्यासह केली अलिबाग परिसरातील चक्रीवादळाच्या नुकसानीची पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी लगतच्या भागात दि.१६ व १७ मे या दोन दिवशी ताऊक्ते चक्रीवादळाचा मोठा परिणाम जाणवला.

या चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची आज पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी येथील स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्यासोबत तातडीने पाहणी केली.



जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, ग्रामीण विकास पाणी पुरवठा चे कार्यकारी अभियंता श्री वेंगुर्ले, अलिबाग तहसिलदार सचिन शेजाळ, गटविकास अधिकारी श्रीमती दीप्ती देशमुख, मंडळ अधिकारी पुंडलिक मोकळ, तलाठी संजय शिंगे हे उपस्थित होते.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे व आमदार महेंद्र दळवी यांनी खानाव, वावे, मल्यान, कुरुळ या गावांना दिलेल्या भेटीत खानाव, उसर, वेलवली गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीच्या झालेल्या नुकसानीची, घरांच्या झालेल्या नुकसानीची तसेच कुरुळ परिसरात महावितरण कडून वीजेचे नवीन पोल बसविण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे, त्याबाबतची पाहणी केली.

पालकमंत्री कु.तटकरे यांनी ग्रामीण विकास पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.वेंगुर्ले यांना खानाव- ऊसर येथे पाण्याची नवीन टाकी उभारण्याचा प्रस्ताव तातडीने पाठविण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे ताऊक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करून लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही तात्काळ करण्याचे आदेश उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले.

## तौक्ते चक्रिवादळाने नुकसान टाळण्यात बोर्ली ग्रामपंचायतीला यश : ग्रामस्थांनी मानले आभार !

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

तौक्ते चक्रिवादळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी निधी चौधरी व मुरुड तहसीलदार गमन गावित यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी महेश निकम, तलाठी शिल्पा कवठे, संदेश पाटील व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वामन चुनेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, सदस्य गणेश कट, भारत जंगम, प्रणाली कोपरदर, भारती बंदरी आदींनी घरोघरी जाऊन संभाव्य चक्रिवादळाबाबत जनजागृती करुन सतर्कतेने उपाययोजना करण्यात आल्यामुळे बोर्ली गावातील जिवितहानी टळून चक्रिवादळाने घरांची कौले व पत्रे फुटल्याने कमीतकमी वित्तहानी झाली आहे. याबाबत ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.



रायगड मध्ये दि.१६ व दि.१७ मे ला चक्रिवादळाचा इशारा देण्यात आला होता. बोर्ली गावातील नुकसान टाळण्यात योग्य प्रकारे नियोजन करून लक्ष ठेवण्यासाठी तीन टिम तयार करण्यात आल्या होत्या. यामुळे कमीतकमी नुकसान होऊन जिवितहानी टळून मदत झाली आहे. तसेच गावातील मच्छिमारांना वेळीच सतर्क केल्यामुळे मच्छिमारांचे नुकसान टाळण्यात मदत झाल्याबद्दल बोर्ली-मांडला मच्छिमार सहकारी संस्थेचे चेअरमन कैलास कोटकर यांनी सरपंच चेतन जावसेन यांचे आभार मानले आहेत. चेतन जावसेन व मतीन सौदागर यांनी योग्य नियोजन करून ग्रामग्रामपंचायत बोर्ली, सुरई व ताराबंदर येथील नुकसानीचे पंचनामे पुर्ण करण्यात आल्याची माहिती दिली.

# आशुतोष दिघे अनंतात विलीन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आशुतोष दिघे जवळचा मित्र १६ मे २०२१ रोजी अनंतात विलीन झाला, असे म्हणण्यापेक्षा श्री स्वामी समर्थ चरणी लीन झाला. मन हेलावून सोडणारी घटना, शेवटी नियतीच सर्व श्रेष्ठ आपल्या आकलन शक्ती बाहेरचे सर्व काही,असे काही होईल याची कोणालाच कल्पना न्हवती.अजूनही खरे वाटत नाही व तो आहे असेच वाटते, आजही त्याच्या सोबत व्यतीत केलेला प्रत्येक क्षण आठवतोय,पण मनाला समजावणे हेच ते काय शिल्लक राहिले आहे.



यावेळी आठवणींना उजाळा देताना अनिल कुरघोडे यांनी सांगितले की, आशुतोष व त्याच्या संपूर्ण कुटूंबियांना फार लहानपणा पासून ओळखतो तसे सर्व आमच्या घरच्यांच्या संबंधीत होते, मात्र आशूची मैत्रीची जवळीक १९९० सालापासूनची,आम्ही दोघे बंगलोरला शिकण्यासाठी गेलो होतो,साधारणतः वर्षभर एकत्रित राहणे, अभ्यास, खाणे-पिणे , फिरणे सर्वच बाबतीत तो काटेकोर असायचा, येथूनच दीर्घकालीन मैत्री झाली, पनवेलला देखील लाईन आळी येथील हनुमान मंदिरात, स्वामी समर्थ मठात तो नियमित येत असे, माझ्यासाठी तो माझा खूपच जवळचा सहकारी होताच पण सहकार्य करणारा ही होता, पूर्वी माझ्या एस.टी.डी. पी.सी.ओ. मध्ये माझ्या अनुप-स्थितत तो स्वतः बसत असे,लोकांना तर तो माझा लहान भाऊच वाटे. तो स्वामी भक्त होता तसे आमचे सर्व मित्र मंडळी स्वामी भक्तच, गणेश मित्र मंडळ, लाईन आळी येथील हनुमान मंदिर असो वा सी. के .पी. समाजाचे कोठलेही काम असो तो त्यात निःस्वार्थी पणे हिरीरीने सहभागी असायचा, सर्वांना तो आपलासा वाटायचा.

आशू धर्मवीर स्वर्गीय आनंद दिघे यांचा पुतण्या,पण त्याचा गवगवा त्याने कधी केला नाही, निवडणूकी काळात त्याने शिवसेनेतर्फे निरीक्षक म्हणून देखील काम पाहिले होते, माझ्यासाठी तो माझा अंतःस्थ मित्र होता, तो पनवेल सोडून लोधिवली (रसायनी) येथे राहावयास गेला.तो व त्याचा मोठा भाऊ अतुल दिघे , मधला भाऊ अमोल ठाणे येथे राहतो. त्यामुळे काही वर्षे संपर्क फार कमी प्रमाणात होते, तसे ते ऑनलाईनच होते, प्रत्येक जण आपापल्या कामात व्यस्त असल्यामुळे पनवेलला आल्यावर क्वचित भेट होई, पण काही कालावधी नंतर आपण निश्चित एकसाथ असू, पूर्वी प्रमाणे असें मनोमन वाटायचे.पण तसे नाही होऊ शकले, त्याचे नुकतेच प्रमोशन होऊन तो सिल्वासा ( गुजराथ) येथे गेला होता, तिथेच त्याची तब्येय बिघडली व तो घरी आला. १९ एप्रिलला आशूच्या मोठ्याभावाचा अतुलचा फोन आला,आशूला खारघर येथे ठेवले आहे, पण तेथून त्याला नानावटी हॉस्पिटलला नेले, तो लवकरच बरा होईल याच आशेने सर्व जण रोज त्याच्या तब्येती बाबत समाधानकारक सुधारणा होईल हीच सदिच्छा बाळगून होते, त्यानेही खूप लढा दिला, मोठा भाऊ अतुल यानेही सर्वोतोपरी खूप प्रयत्न केले, शेवटी मनाविरुद्ध बातमी आली , अघटित, अनाकलनीय, अनुत्तरित अशीच ही घटना. आशुतोष रविवारी १६ मे रोजी इहलोकीची यात्रा संपवून अनंतात समर्थ चरणी लीन झाला. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई, भाऊ, सासू, सासरे, असे कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या ( दिघे परिवार ) दुःखात पनवेल वैभव परिवार, गणेश मित्र मंडळ सर्व सदस्य, स्व.आनंद दिघे प्रतिष्ठान, सहभागी आहेत.


राव साहेब

**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अर्ज क्र.५७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०६/२०२१

**कै.शांताबाई गणपत पाटील मयतचे वारस**
**१) श्री.सुनील गणपत पाटील**
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
**२) श्री.विश्वनाथ गणपत पाटील**
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
वरील १ व २ रा.मु.पारगांव डुंगी,
पोस्ट : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. शांताबाई गणपत पाटील** ह्यांचे निधन दि.२०/१०/२०२० रोजी मु.पारगांव डुंगी, पोस्ट : पारगांव, ता.पनवेल जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच त्यांची आई **कै.महादीबाई महादेव पाटील** यांचे निधन सन १९८८ रोजी मु.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. **श्री.सुनील गणपत पाटील, वगैरे** ह्यांनी **कै.शांताबाई गणपत पाटील** यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | ३९ | ४ | ०-१३-५ | - |
| | ४० | ५ | ०-०६-१ | - |
| | ४२ | २ | ०-४१-९ | - |
| | ४४ | १७ | ०-१८-९ | - |
| | ४४ | ७ | ०-१४-९ | - |

वरील सामाईक संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून **कै.शांताबाई गणपत पाटील** यांना **मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड येथे सेक्टर ८, भूखंड नं.६५, क्षेत्र १५१० चौ.मी. चा** भूखंड वितरित करण्यात आलेला आहे. **श्री.सुनील गणपत पाटील, वगैरे** हे **कै.शांताबाई गणपत पाटील** यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट **श्री.सुनील गणपत पाटील, वगैरे** यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर **कै.शांताबाई गणपत पाटील** यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/०५/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



राव साहेब

**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अर्ज क्र.५७३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०६/२०२१

**कै.सोनाबाई दत्तात्रेय पाटील मयतचे वारस**
**१) श्री.निलकंठ दत्तात्रेय पाटील**
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
**२) श्री.सुभाष दत्तात्रेय पाटील**
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
वरील १ व २ रा.मु.सरसन, हनुमान मंदिर समोर,
पो.साजगाव, ता.खालापूर, जि.रायगड
**३) श्रीमती.जयश्री सुरेश गोंधळी**
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.११५ पाडा विचुंबे,
पो.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. सोनाबाई दत्तात्रेय पाटील** ह्यांचे निधन दि.२२/११/२०१९ रोजी मु.पोस्ट सरसन, ता.खालापूर, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच त्यांची आई **कै. जनाबाई बाबु चिमणे** यांचे निधन दि.०५/०३/१९८८ रोजी मु.जुई कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाले आहे. **श्री.निलकंठ दत्तात्रेय पाटील, वगैरे** ह्यांनी **कै.सोनाबाई दत्तात्रेय पाटील** यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | ३९ | ४ | ०-१३-५ | - |
| | ४० | ५ | ०-०६-१ | - |
| | ४२ | २ | ०-४१-९ | - |
| | ४४ | १७ | ०-१८-९ | - |
| | ४४ | ७ | ०-१४-९ | - |

वरील सामाईक संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून **कै.शांताबाई गणपत पाटील** यांना **मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड येथे सेक्टर ८, भूखंड नं.६५, क्षेत्र १५१० चौ.मी. चा** भूखंड वितरित करण्यात आलेला आहे. **श्री.निलकंठ दत्तात्रेय पाटील, वगैरे** हे **कै.सोनाबाई दत्तात्रेय पाटील** यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट **श्री.निलकंठ दत्तात्रेय पाटील, वगैरे** यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर **कै.सोनाबाई दत्तात्रेय पाटील** यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/०५/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मोटार सायकलच्या अपघातात दोघेजण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील रसायनी समोर टेककेअर यार्ड समोर दोन मोटार सायकलींच्या झालेल्या अपघातात दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

रसायनी जवळील राष्ट्रीय महामार्ग क्र.८२ या ठिकाणी मोटार सायकल सुपर स्प्लेंडर व यामहा आर १-५ या दोन मोटार सायकलींचा अपघात होवून यात प्रतिक गोडविले (२५) व शेखर गडगे (३०) हे दोघे जखमी झाले असून त्यांना पनवेल येथील गांधी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

## गव्हाण गावातील ८५ वर्षाच्या आजोबांची कोरोनावर मात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील गव्हाण या गावातील गणपत दामोदर देशमुख वय वर्ष ८५ या आजोबांना काही दिवसांपूर्वी कोरोनाची लागण झाली होती. त्यानंतर त्यांना उलवे सेक्टर १९ येथील फिनिक्स हॉस्पिटल येथे ठेवण्यात आले.

१० ते १२ दिवसाच्या डॉक्टर उपचारानंतर आजोबा कोरोना सारख्या गंभीर आजारावर मात करून आपल्या घरी परतले आहेत. यावेळी त्यांच्या कुटुंबियांनी केक कापून तसेच गावातील लोकांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

## सुधागड तालुक्यात कोरोनामुळे तिघांचा मृत्यू, तर ६ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात कोरोनाची परिस्तिती दिवसेंदिवस गंभीर बनतेय. ३ कोरोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर ६ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली असून १४ जण बरे झाले आहेत. सध्या तालुक्यात कोरोनाचे १२५ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १०३५ रुग्ण झाले असून ८६५ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ४५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे.

# पोलादपूर तालुक्यातील वादळग्रस्त ग्रामीण जनतेला पंचनाम्यात अडवू नका : आ.भरत गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील ग्रामीण भागातील गरीब जन-तेला कोरोनाच्या लॉकडाऊनने पिडले आहे तर तोत्तेफ वादळाने नाडले आहे. महसूली पंचनामे करताना तोत्तेफ वादळग्रस्तांना अडवू नका, असे आवाहन आ.भरत गोगावले यांनी तहसिल कार्यालयातील आढावा बैठकीमध्ये केले.



पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये आ.भरत गोगावले यांच्यासमवेत तहसिलदार दिप्ती देसाई, नायब तहसिलदार शरद आडमुठे, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, सहायक पो-लीस निरिक्षक प्रशांत जाधव, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे, गटविकास अधिकारी जगताप, तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर १, चरई १९, चोळई २, तुर्भे बुद्रुक १३, धारवली ५, सवाद ३, वाकण ३७, कापडे बुद्रुक ११, देवळे ३५, उमरठ ५०, मोरसडे १०२, बोरघर १६३, पळचिल ३७, कोतवाल बुद्रुक १९२, देवपूर ७२, गोळेगणी ७३ व चांभारगणी ३७ तर लोहारे सजेमध्ये ० अशा घरांची हानी तोत्तेफ वादळादरम्यान झाल्याची नोंद झाली आहे, अशी माहिती तहसिलदार दिप्ती देसाई यांनी देऊन उमरठ येथील सर्व ५०, चरई येथील सर्व १९ तर तुर्भे बुद्रुक येथील १३ बाधित घरांचा पंचनामा झाला असून सर्व पंचनामे करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू असल्याची माहिती दिली.

याप्रसंगी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, तालुक्यातील अनेक घरकुलांची हानी गेल्या तीन वादळांमध्ये झाली असून घरकुलांच्या मदतीचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित असल्याने घरकुलधारकांना कोणतीही आर्थिक क्षमता नसतानाही वादळानंतर दुरूस्ती करता येत नसल्याचे निदर्शनास आणून दिले. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जगताप यांनी एकूण वादळग्रस्त घरकुलांची माहिती घेऊन अहवाल देण्यासंदर्भात आश्वासन दिले. यावेळी आ.गोगावले यांनी, सदर प्रकरणी विशेषबाब म्हणून राज्यसरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली.

## तौक्ते चक्रीवादळ व तुफान पावसामुळे कोलाड परिसरातील शेतकऱ्यांच्या भातशेतीचे प्रचंड नुकसान

**गुरांच्या चाऱ्यांचा प्रश्न गंभीर, तातडीने पंचनामे करण्याची मागणी**



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड-खांब परिसरातील शेतकऱ्यांचे तौक्ते चक्रीवादळ व तुफान पडलेल्या पावसामुळे कापून ठेवलेल्या भातशेतीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन ग्रुांच्या चाऱ्यांचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या भातशेतीचे त्वरित पंचनामे करावे अशी मागणी बळीराजा करुन केली जाते.

कोलाड-खांब परिसरातील कोलाड, महादेववाडी, हेटवणे, चिंचवली, तिसे, पुई, गोवे, मुठवली, शिरवली, पुगांव, खांब, नडवली व या परिसरातील इतर काळव्याच्या पाण्यावर पिकवली जाणारी भातशेतीचे तौक्ते चक्रीवादळ व प्रचंड तुफान पडलेल्या पावसामुळे भातशेतीचे नुकसान झाले आहे. या परिसरातील भातशेती ही कोलाड पाटबंधारे विभाग यांच्या मार्फत सोडण्यात येणाऱ्या कालव्याच्या पाण्यावर भातशेती केली जाते.

या पाण्यावर केली जाणारी भातपिके उत्तम प्रकारे आली.व पावासाला सुरु होण्यास पंधरा ते वीस दिवस शिल्लक असल्यामुळे या विभागातील शेतकऱ्यांनीभातशेतीची कापणी, बांधणी केली केली परंतु अवकाळी आलेल्या तौक्ते चक्रीवादळ व तुफान पाऊस यामुळे कापून बांधून ठेवलेल्या भातपिकात पाणीच पाणी होऊन भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबरोबर पावसाला हंगामात चार महिने पुरणारा ग्रुांचा चारा पेंडा हे ही भिजल्यामुळे ग्रुांच्या चाऱ्याचा प्रश्न ही गंभीर बनला आहे.

पाटबंधारे विभागाला या अगोदरच काळव्याचे पाणी बंद करण्यासाठी सांगितले होते. परंतु त्यांनी पाच ते सहा दिवस पाणी बंद करण्यासाठी जास्त दिवस लावल्यामुळे शेतातील पाणी निघण्यास वेळ गेला नंतर भात कापणी केली ती तौक्ते चक्रीवादळ व तुफान पावसामुळे शेतात प्रचंड पाणी साठून भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन नुकसान झालेल्या भातशेतीचे त्वरित पंचनामे करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती वाळंज यांनी केली आहे.

अगोदर बीबीयाणे, खते यांची भाव वाढ यामुळे शेतकरी वर्गाला जास्त किमंत मोजावी लागली तरी सर्व परिस्थितीवर मात करीत शेतकरी वर्गाने भातशेती केली व भात पीक ही उत्तम प्रकारे आले. परंतु दोन दिवस पडणारा तुफान पाऊस यामुळे हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला असल्यामुळे बळीराजा हताश झाला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या भातशेतीचे त्वरित पंचनामे करावे अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## चक्रीवादळाचा उरणच्या मच्छिमारांनाही जोरदार तडाखा

**मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान**



**दै.रायगड नगरी । उरण**

तौक्ते चक्रीवादळाचा जोरदार तडाखा उरण तालुक्यातील मच्छीमारांनाही बसला असुन मासेमारी करून परतलेल्या १५० बोटी ससुनडॉक आणि मोरा बंदरात अडकून पडलेल्या आहेत.तर चक्रीवादळाची सुचना मिळताच मासेमारी अर्ध्यावर सोडून माघारी परतलेल्या सुमारे ३०० बोटी सुरक्षिततेसाठी विविध बंदराच्या आश्रयाला गेल्या आहेत. मासेमारी अर्ध्यावर सोडून माघारी परतल्यामुळे मच्छी मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असल्याची माहिती करंजा मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी दिली आहे.

संचारबंदी लागू झाल्यानंतर पुन्हा १ जुन २०२१पासुन राज्यातील मच्छी मच्छिमारांसाठी पावसाळी मासेमारी बंदीचा काळ सुरू होणार आहे. याधीच लागोपाठच्या सहा चक्रीवादळाचा जबरदस्त परिणाम मासळी व्यवसायावर झाला. त्यातच नव्याने आलेल्या ताऊक्ती चक्रीवादळाचा जोरदार तडाखा उरण तालुक्यातील मच्छीमच्छिमारांनाही बसला आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे करंजा, मोरा येथील मासेमारी करून परतलेल्या आणि टनावारी मासळीने भरलेल्या १५० मच्छिमार बोटी विविध बंदरात नांगरुन ठेवण्यात आल्या आहेत.

यामध्ये ससुनडॉक बंदरात १०० तर मोरा बंदरात मासळीने भरलेल्या ५९ बोटींचा समावेश आहे. तर चक्रीवादळाच्या सुचने पुर्वी खोल समुद्रात उरण परिसरातील सुमारे ३५० ते ४०० मच्छिमार बोटी खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी निघाल्या होत्या. मात्र येऊ घातलेल्या ताऊक्ती चक्रीवादळाच्या धोक्याच्या इशाऱ्यानंतर खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी निघालेल्या ३५० ते ४०० मच्छिमार बोटी मासेमारी अर्ध्यावर सोडून माघारी परतल्या आहेत. चक्रीवादळापासुन सुरक्षितेसाठी नजीकच्या किनारा गाठीत मिळेल त्या बंदरात मच्छीमार बोटी नांगर टाकून स्थिरावल्या आहेत.

यापैकी ३२५ बोटी उरणच्या मोरा बंदरात तर दिघी बंदरात ७५ बोटींची आश्रय घेतला आहे. खोल समुद्रातील मासेमारी अर्ध्यावर सोडून माघारी परतलेल्या बोटींचा लाखो रुपये इंधन, बर्फ, खलाशी आणि इतर साधन सामग्रीवर केलेला खर्च अगदी वाया गेला आहे. यामुळे मच्छी मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी एका ट्रीपसाठी १५ दिवसांचा कालावधी लागतो. १ जून २०२१पासून पावसाळी मासेमारीचा बंदीचा कालावधी सुरू होणार आहे. त्यामुळे वादळ शमलं तरी आता उरलेल्या ८ ते १० दिवसांच्या कालावधीत खोल समुद्रातील मासेमारीची खेप शक्य होणार नाही. यामुळे पावसाळी मासेमारी बंदी पुर्वीच मासेमारी हंगाम संपुष्टात आला आहे. त्यातच उरण परिसरातील मच्छीमारांची डिझेल परताव्याची सुमारे १७ कोटी रुपये थकले आ-हेत. परताव्या अभावीही मच्छीमारांचे आर्थिक कंबरडे मोडले असल्याची माहिती करंजा मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी दिली आहे.

# वादळात पनवेल येथील रिटघर शाळेचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तौक्ते वादळाचा तडाखा पनवेल मधील रिटघर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाच्या इमारतीला चांगलाच बसला आहे. दोन वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या खोल्यांमधील दोन वर्गखोल्यांचे छप्पर उडून भिंतींची पडझड झाल्याने विद्यालयाचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबतची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भारती नाईक यांनी दिली आहे. विद्यालयाचे नुकसान पाहताना मन गहिवरून येत असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.



रयत शिक्षण संस्थेची पनवेल जवळील रीतघर येथे श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय आहे. या विद्यालयांमध्ये सहाशे ते सातशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने येथील माध्यमिक विद्यालय आहे. या टुमदार इमारत तिच्या बाजूलाच पाच ते सहा वर्गखोल्यांची इमारत दोन वर्षापूर्वीच बांधण्यात आली होती. या खोल्यांमधून पाचवी ते सातवीचे वर्ग भरवण्यात येत होते. मात्र कोरोना काळात सद्य स्थितीत शाळा बंद असले मुळे वर्गखोल्या उघडण्यात आल्या नव्हत्या. तरीही वादळाची पूर्वकल्पना मिळाल्यानंतर विद्यालय कर्मचारी व मुख्याध्यापकांनी या वर्ग खोल्यामध्ये असलेले काही सामान, पंखे अन्य ठिकाणी हलवले होते. मात्र वादळाचा जोरदार तडाखा एवढा बसला की त्यामध्ये या इमारतीतील दोन वर्गखोल्यांचे पूर्ण लोखंडी कैच्या पत्रा सहित उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. लोखंडी कैच्या बरोबरच या इमारतीच्या काही भिंतींची ही पडझड झाल्याने शाळेचे फार मोठे शैक्षणिक व आर्थिक नुकसानही झाले आहे.

याबाबतची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भारती नाईक यांनी पनवेल पंचायत समितीतील गटशिक्षणाधिकारी यांना ही दिलेली आहे. सदर विद्यालयाची पाहणी पोलीस पाटील यांनी घटनास्थळी येऊन केलेली आहे. या विद्यालयाची वादळामुळे झालेली आणि हानी व झालेली पडझड पाहताना मन गहिवरून येत असल्याची भावना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भारती नाईक यांनी व्यक्त केली आहे.

## चक्रीवादळात कामोठ्यातील मच्छी मार्केट उद्ध्वस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काल झालेल्या तौत्के चक्री वादळामुळे कामोठे येथील मैदानावर येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त मच्छी विक्रेत्यांनी स्वखर्चाने उभारलेले मार्केट अक्षरशः उध्वस्त झाले आहे. त्यामुळे येथे व्यवसाय करीत असलेल्या मच्छी विक्रेत्यांवर मोठे संकट ओढवले आहे.

हे मार्केट उभे करण्यासाठी येथील स्थानिक भूमिपुत्र असणाऱ्या मच्छी विक्रेत्यांनी प्रत्येकी ५ हजार वर्गणी काढून येथे बांबू आणि ताडपत्रीची निवारा शेड उभारली होती. त्याचप्रमाणे येथे विजेची व्यवस्था देखील करण्यात आली होती. मात्र काल झालेल्या तौत्के चक्रीवादळात ही शेड जमिनदोस्त झाली. त्याचबरोबर मच्छी विक्रेत्यांचे फ्रिज, मच्छी साठवण्यासाठी वापरण्यात येणारे थर्माकॉलचे डब्बे याचे नुकसान झाले असून त्यात ठेवलेली हजारो रुपयांची मच्छी खराब झाली आहे.

या प्रचंड नुकसानीमुळे येथील मच्छी विक्रेत्यांवर आता उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे आता आमच्या नुकसानीचे पंचनामे करुन आम्हाला त्वरित भरपाई द्यावी अशी मागणी येथील जय हनुमान रोजबाजार मच्छी मार्केट चे अध्यक्ष बबलु गोवारी यांनी केली आहे.



## खंडित झालेला वीजपुरवठा युद्धपातळीवर काम करून तात्काळ सुरु करावा : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तौक्ते चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील ६६१ गावांवर पडला जवळपास १ लक्ष ६ हजार नागरिक वीजपुरवठयापासून वंचित झाले आहेत.

यासंदर्भात पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमवेत तातडीची बैठक एमआयडीसी रेस्ट हाऊस येथे घेतली. यावेळी आमदार महेंद्र दळवी, नगराध्यक्ष प्रशांत नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, महावितरणचे भांडुप विभागाचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर, अधीक्षक अभियंता दीपक पाटील, कार्यकारी अभियंता कुंदन भिसे हे उपस्थित होते. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांना पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी निर्देश दिले की, चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन वीजपुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरू करावी. युद्धपातळीवर काम सुरू करून नागरिकांसाठी वीजपुरवठा पूर्ववत सुरू होईल, यासाठी कसोशीने प्रयत्न करावेत.


# ग्रामपंचायत कोळखे

**ता.पनवेल, जि.रायगड**

**जाहीर निविदा**

प्रति,
अधिकृत/अनुभवी ठेकेदार

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१९/०५/२०२१ ते दि.२७/०५/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळकतील.

सदर निविदा दि.२८/०५/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | नग | निधी |
|---|---|---|---|
| १ | वाफारा मशिन (स्टीम) खरेदी करणे | १५०० | ग्रामनिधी (२०२१-२०२२) |
| २ | हायमॅक्स खरेदी करणे | ४ | १५ वा वित्त आयोग (२०२०-२०२१) |

अटी व शर्ती :-

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा आधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे, त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे. त्याचे मुल्यांकनाप्रमाणे बिल अदा करण्यात येईल.

३) काम ज्याच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रुपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे

४) कामाचे ईस्टीमेट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

दि.१८/०५/२०२१

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**